**आरबीआय/२००४-०५/३४७**
क्रमांक. सीओ.डीटी. १३.०१.,२९९/एच. ६२८४-६३१३/२००४-०५

१५ जानेवारी २००५

अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक,
भारतीय स्टेट बँक आणि संलग्न बँका,
आणि १७ राष्ट्रीयीकृत बँका.

व्यवस्थापकीय संचालक,
आयसीआयसीआय/ आयडीबीआय/ एचडीएफ़सी/ युटीआय बँक मर्यादीत लिमिटेड
भारतीय रोखेधारक महामंडळ/ स्टॉक होल्डिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड

माननीय महोदय,

**रिलीफ़/ बचत रोखे योजना -- मुखत्यारनामा तसेच मुदत समाप्ती झालेल्या रोख्यांसाठी धनाकर्ष /ड्राफ्ट जारी करणे.**

वर उल्लेख केलेल्या रोखे योजनांच्या मुदत समाप्तीनंतर मिळणारे उत्पन्न सध्या सगळ्या संयुक्त रोखेधारकांच्या नावावर देण्यात येते. त्या ऐवजी हे उत्पन्न कुठल्यातरी एकाच गुंतवणुकदाराच्या नावावर जारी करण्यात यावे अशा सूचना आम्हाला या योजनांमधल्या संयुक्त गुंतवणूकदारांकडून मिळत आहेत. आम्ही या प्रकरणाचा अभ्यास केला आहे. त्यानुसार या प्रकरणातल्या संबंधितांना आमचा असा सल्ला आहे कीः- १८७२च्या भारतीय कंत्राटी कायद्याच्या ४५व्या कलमा अंतर्गत, संयुक्त हक्कांच्या हस्तांतरणाशी संबंधित व्यवहार करण्यात येतात. त्यानुसार या यॊजनेच्या मुदत समाप्तीनंतर मिळणारे उत्पन्न कुठल्यातरी एकाच गुंतवणुकदाराच्या नावावर करण्यात अडचण येणार नाही. मात्र त्यासाठी संयुक्त रोखेधारकांनी आपला हेतू स्पष्ट करणारा मुखत्यारनामा देणे गरजेचे ठरते. म्हणजेच रोख्यांच्या मुदत समाप्तीचे उत्पन्न ज्या एका गुंतवणुकदाराच्या नावावर जारी करायचे असॆल, त्याच्या नावाला आपली हरकत नसल्याचे दर्शवण्यासाठी इतर रोखेधारकांनी, संयुक्त रोखे धारकांच्या मुखत्यारनाम्याच्या विहीत नमुन्यात, त्या गुंतवणुकदाराच्या नावाने मुखत्यारनामा जारी करणे गरजेचे आहे. त्यामुळे ज्या गुंतवणुकदाराच्या नावावर असा मुखत्यारनामा जारी करण्यात आला आहे त्याच्या नावाचा प्रदानादेश /पे ऑर्डर काढ़णे संबंधीताना शक्य होईल.

२. वर देण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने तसेच ग्राहकांना अधिक चांगली सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने,आम्ही एकाच गुंतवणुक्दाराच्या नावावर रोखे योजनेच्या मुदत समाप्तीचे उत्पन्न जारि करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र त्यासाठी, संयुक्त रोखेधारकांच्या मुखत्यारनामाच्या विहीत नमुन्यात (नमुना सोबत जोडलेला आहे.), ज्या एका गुंतवणुकदाराच्या नावावर हे उत्पन्न द्यायचे असेल, त्याच्या नावाने इतर संयुक्त रोखेधारकांनी आपला मुखत्यारनामा देणे आवश्यक आहे. तसेच या मुखत्यारनाम्याच्याच अनुषंगाने प्रथम रोखेधरकाच्या नावावर व्याज अभिपत्र /इंटरेस्ट वॉरंट जारी करण्याची परवानगी यापूर्वीच देण्यात आलेली आहे. (सी एफ़. क्रमांक. सीओ. डीटी. १३.०१.२०१/१४८८/२०००-०१/दिनांक २० सप्टेंबर २०००)

३. त्यामुळे, ज्या गुंतवणुकदाराच्या नावाने इतर संयुक्त रोखेधारकांनी मुखत्यारनामा जारी करु शकता.
४. या रोखे योजना राबवणाऱ्या इतर शाखांनाही तुम्ही संबंधीत योजनेची कृपया माहिती द्यावी.
५. कृपया या परिपत्रकाची पोच द्यावी.

**आपला विश्वासू,**
**डी. राजगोपालाराव,**
**उप महाव्यवस्थापक**